# भुयारीकरणाचा वेग सुसाट...

## कफ परेड ते विधान भवनादरम्यान १ किलोमीटरचे भुयार : विद्यानगरी येथील भुयारीकरणाचा बारावा टप्पाही पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गाचे काम वेगाने सुरु असून, गुरुवारी विधान भवन येथील एक किलोमीटर भुयाराचे काम पूर्ण झाले; तर विद्यानगरी येथील भुयारीकरणाचा बारावा टप्पाही पूर्ण करण्यात आला आहे.

एमएमआरसी अंतर्गत पॅकेज एकमधील विधान भवन मेट्रो स्थानकावर गुरुवारी भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला. ९५ मीटर लांब सूर्या वन या टीबीएम मशीनद्वारे अप मार्गावर कफ परेड ते विधान भवनदरम्यानचे १.२ किलोमीटर लांब असे भुयार खणण्यात आले. तर एमएमआरसी अंतर्गत पॅकेज ५ मधील विद्यानगरी दक्षिण शाफ्ट येथे गोदावरी ४ या टीबीएम मशीनद्वारे भुयारीकरणाचा १२ वा टप्पा पार पडला. गुरुवारी म्हणजे एकाच दिवशी पॅकेज १ आणि ५ मध्ये मिळून भुयारीकरणाचे २ टप्पे पूर्ण झाले.




**१५ एप्रिल :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ ते सहार दरम्यानच्या डाऊन मार्गावरील भुयारीकरणाचा टप्पा पार. अप मार्गावर टी-२ ते सहार मार्गावर भुयारीकरणासाठी तापी-१ टीबीएम सज्ज.

**१५ एप्रिल :** ग्रँट रोड मेट्रो स्थानक - २०२ एमटीआर लांबीच्या या भूमिगत मेट्रो स्थानकाची आधुनिक कट अँड कव्हर व एनएटीएम पद्धतींचा एकत्रितपणे वापर करून बांधणी.

**१२ एप्रिल :** सिद्धिविनायक मेट्रो स्टेशन बॉक्समधील सातव्या बेस स्लॅबच्या काँक्रिट भरणीचे काम पूर्ण. एकूण १३० मेट्रिक टन इतके स्टील, ६१९ घन मीटर इतके काँक्रिट सिमेंटचा वापर करत हे काम ताशी २५ घन मीटर या वेगाने पूर्ण.

**१२ एप्रिल :** वैनगंगा ३ टीबीएमद्वारे पाली मैदान ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ दरम्यानचा भुयारीकरणाचा पहिला टप्पा पूर्ण. सारीपुतनगर ते सीप्झ या मार्गावर ५७३ मीटर इतके भुयार खणण्यास प्रारंभ.

**१० एप्रिल :** मरोळनाका मेट्रो स्टेशन बॉक्समधील मलबा खणण्याचे काम पूर्ण. प्रतिदिन २५८ क्यूबिक मीटर या गतीने हे काम पूर्ण. स्थानकाच्या ६४ टक्के बेस स्लॅबचे काम पूर्ण.